क्र.आस्था(२/४)/इएसटी/आयसीसी/२०१६–१७/१७

परिपत्रक :–

विद्यापीठातील सर्व विभागांचे संचालक/विभाग प्रमुख, सर ज. जी. वास्तुशास्त्र महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य, मुंबई विद्यापीठ ग्रंथालयाचे प्रभारी ग्रंथपाल, स्थानापन्न परिक्षा नियंत्रक, वित्त व लेखा अधिकारी, सर्व उपकुलसचिव, नियंत्रक–मुद्रण व लेखन सामुग्री, विद्यापीठ अभियंता, सर्व सहायक कुलसचिव आणि कुलसचिवांच्या कार्यालयातील सर्व विभागांचे/कक्षांचे प्रमुख यांना कळविण्यात येते की, महाराष्ट्र शासन राजपत्र, सामान्य प्रशासन विभाग यांचे दिनांक ८ फेब्रुवारी २०१७ क्रमांक सार्वसु. १११७/७५/प्र.क्र. २३/२९.–परक्राम्य संलेख अधिनियम, १८८१ (१८८१ चा अधिनियम २६) च्या कलम २५ मध्ये दर्शविलेल्या व भारत सरकारच्या गृह मंत्रालयाची अधिसूचना क्रमांक–३९/१/६८/जेयुडीएल–तीन, दिनांक दिनांक ०८ मे १९६८ अन्वये महाराष्ट्र शासनास सोपविलेल्या अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासन याद्वारे राज्य निवडणूक आयोगाने जाहिर केलेल्या निवडणूक कार्यक्रमांतर्गत जळगाव, अहमदनगर, औरंगाबाद, जालना, परभणी, हिंगोली, बीड, नांदेड, उस्मानाबाद, लातूर, बुलढाणा, यवतमाळ, वर्धा, चंद्रपूर व गडचिरोली या १५ जिल्हापरिषदांकरिता त्यांच्या कार्यक्षेत्रात व त्याअंतर्गत १६५ पंचायत समित्यांच्या क्षेत्रामध्ये, सार्वत्रिक निवडणुकांच्या मतदानाच्या दिवशी **गुरुवार दिनांक १६ फेब्रुवारी, २०१७ रोजी** सार्वजनिक सुट्टी जाहिर करीत आहे. मात्र यातील गडचिरोली जिल्हापरिषदेअंतर्गत कोरची, कुरखेडा, देसाईगंड (वडसा), आरमोरी, गडचिरोली, धानोरा, चामोर्शी व मुलचेरा या ८ पंचायत समिती क्षेत्रापुरती सदरची सुट्टी मर्यादित राहिल. सदर निवडणूकांसाठी मतदारांना मतदान करणे शक्य व्हावे यासाठी वरील दिनांकास त्या मतदार क्षेत्रातील कर्मचाऱ्यांना सुट्टी मंजूर करण्यात येत आहे.

त्याचप्रमाणे रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, नाशिक, पुणे, सातारा, सांगली, सोलापूर, कोल्हापूर, अमरावती व गडचिरोली या ११ जिल्हापरिषदांकरिता त्यांच्या कार्यक्षेत्रात व त्याअंतर्गत ११८ पंचायत समित्यांच्या क्षेत्रामध्ये, तसेच बृहन्मुंबई, ठाणे, उल्हासनगर, पुणे, पिंपरी–चिंचवड, सोलापूर, नाशिक, अकोला, अमरावती व नागपूर या १० महानगरपालिकांच्या क्षेत्रामध्ये सार्वत्रिक निवडणुकांच्या मतदानाच्या दिवशी **मंगळवार दिनांक २१ फेब्रुवारी, २०१७ रोजी** सार्वजनिक सुट्टी जाहिर करीत आहे. मात्र यातील गडचिरोली जिल्हा परिषदेअंतर्गत, अहेरी, एटापल्ली, भामरागड व सिरोंचा या ४ पंचायत समिती क्षेत्रापुरती सदरची सुट्टी मर्यादित राहिल.

सदर निवडणूकांसाठी मतदारांना मतदान करणे शक्य व्हावे यासाठी सार्वत्रिक निवडणुकांच्या मतदानाच्या दिवशी **मंगळवार दिनांक २१ फेब्रुवारी, २०१७ रोजी** सार्वजनिक सुट्टी जाहिर करण्यात येत आहे. सदर बाब संबंधित कर्मचाऱ्यांच्या निदर्शनास आणावी.

कुलसचिव

मुंबई–४०००३२
१४ फेब्रुवारी, २०१७

प्रति,

विद्यापीठातील सर्व विभागांचे संचालक/विभाग प्रमुख,
सर ज. जी. वास्तुशास्त्र महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य,
विद्यापीठ ग्रंथालयाचे प्रभारी ग्रंथपाल,
स्थानापन्न परीक्षा नियंत्रक, वित्त व लेखा अधिकारी,